महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

---

**अतितात्काळ / सर्वप्राथम्य :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/विपअताप्र/२०२३/२५८
दिनांक : 12 JAN 2023

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व अभियांत्रिकी महाविद्यालये
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र. १५५३८**
**कोरोना आणि टाळेबंदीचे कारण देत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वेतन न देणा-या वेतनात कपात करणा-या अभियांत्रिकी महाविलयांवर कारवाई करणेबाबत...**

संदर्भ :- १.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांक : २/एनजीसी/विपअताप्र/२०२२/३८, दि.११.०१.२०२३
२.शासन पत्र क्र. विपअताप्र-२८२३/१५५३८/प्र.क्र.१/तांशि-३, दि.०५.०१.२०२२ (२०२३)

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रान्वये मा. श्री नागोराव गाणार व इतर विधान परिषद सदस्यांनी विचारलेल्या अतारांकित प्रश्न क्र. १५५३८ ची प्रत सोबत अग्रेषित करुन, याबाबतच्या वस्तुस्थितीसह माहिती त्वरीत सादर करण्यास या विभागीय कार्यालयास आदेशित केले आहे. सोबत संदर्भिय पत्राची प्रत सहपत्रांसह जोडली आहे.

तरी सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संस्थाप्रमुखांना या पत्राव्दारे सूचित करण्यात येते की, मा.श्री. नागोराव गाणार व इतर मान्यवर विधान परिषद सदस्यांनी विचारलेल्या अतांरांकित प्रश्न क्र. १५५३८ च्या अनुषंगाने **आपल्या संस्थेची प्रश्ननिहाय माहिती** (उत्तरे) या पत्रासोबत दिलेल्या **गुगलफॉर्म लिंकवर** दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत, सादर करण्यात यावी. तसेच सदर माहितीबाबत संस्थाप्रमुखांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र दिलेल्या लिंकवर अपलोड करण्यात यावे.

सोबत : संदर्भिय पत्रांच्या प्रती

**(डॉ.द.व्यं.जाधव)**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४५०, ४४२, ४४३
ई-मेल — desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://www.dte.maharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/विपअताप्र/२०२२/ 38 दिनांक: 11 JAN 2023
**विधिमंडळ कामकाज/ सर्वप्राथम्य**

प्रति,
सहसंचालक,
तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे,नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

विषय : विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.१५५३८
कोरोना आणि टाळेबंदीचे कारण देत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन न देणा-या वेतनात कपात करणा-या अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कारवाई करणेबाबत....
संदर्भ : शासन पत्र क्र. विपअताप्र-२८२३/१५५३८/प्र.क्र.१/तांशि ३, दि. ०५.०१.२०२२ (२०२३)

विषयांकीत शासन पत्रान्वये मा. श्री. नागोराव गाणार व इतर विधान परिषद सदस्यांनी विचारलेल्या अतारांकित प्रश्न क्र. १५५३८ ची प्रत सोबत अग्रेषित करून याबाबतच्या वस्तुस्थितीसह माहिती त्वरीत सादर करण्यास आदेशित केले आहे. सोबत संदर्भीन शासन पत्राची प्रत सहपत्रासह जोडली आहे. करीता मा. श्री. नागोराव गाणार व इतर मान्यवर विधान परिषद सदस्यांनी विचारलेल्या अतारांकित प्रश्न क्र. १५५३८ च्या अनुषंगाने प्रश्ननिहाय उत्तरे व पुरक टिप्पणी तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
४ था मजला, मंत्रालय (विस्तार),
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२०४०९३५ Email ID: tashi3-hted@mah.gov.in

विधिमंडळ कामकाज / सर्वप्राथम्य

क्रमांक:-विपअताप्र-२८२३/१५५३८/प्र.क्र.१ /तांशि-३ दि.५ जानेवारी, २०२२

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
मुंबई-४०० ००१.

पत्र प्राप्त ...
6 JAN 2023
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-

विषय:-विधानपरिषद अतारांकित प्रश्न क्र.१५५३८
कोरोना आणि टाळेबंदीचे कारण देत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन न देणाऱ्या वेतनात कपात करणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कारवाई करणेबाबत...

श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, विधानपरिषद सदस्य यांनी विचारलेल्या अतारांकित प्रश्न क्रमांक-१५५३८ चे मुद्दे खालीलप्रमाणे आहे:-

१) कोरोना आणि टाळेबंदीचे कारण देत अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन न देणे तसेच वेतनात कपात करणे अशा घटना दि.१६ जून, २०२२ रोजी निदर्शनास आल्या आहे हे खरे आहे काय?

२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने नेमलेल्या विशेष समितीच्या अहवालामध्ये दोषी ठरविण्यात आलेल्या महाविद्यालयांवर अद्याप कोणतीही कारवाई केली वा करण्यात येत आहे,

३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत?

सदर अतारांकित प्रश्नाची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाशी संबंधित वस्तुस्थितीसह माहिती शासनास त्वरित पाठविण्यात यावी.

५-१-२०२३

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

D-2

क्रमांक - _____ / ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
दिनांक - २९-१२-२०२२

प्रति,
सचिव
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

महोदय,

खालील उदधृत केलेला विधानपरिषद अतारांकित प्रश्न माननीय उप सभापतींनी स्वीकृत केला आहे. सदरहू प्रश्नाचे उत्तर महाराष्ट्र विधानमंडळ नियमांतील नियम ७०(२) अन्वये तीस दिवसांच्या आत म्हणजे दिनांक ३० जानेवारी, २०२३ पावेतो या सचिवालयास पाठविण्यात यावे –

प्रत माहितीसाठी सादर अग्रेषित –

(१) माननीय मुख्यमंत्री
(२) माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री
(३) सर्व संबंधित सदस्यांना

आपला

प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद

---

**कोरोना आणि टाळेबंदीचे कारण देत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन न देणाऱ्या वेतनात कपात करणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत**

अतारांकित प्रश्न क्रमांक १५५३८ श्री. नागोराव गाणार, श्री. प्रवीण दटके, श्री. प्रविण दरेकर, श्री. विजय उर्फ भाई गिरकर, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रमेश कराड, श्रीमती उमा खापरे

सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना आणि टाळेबंदीचे कारण देत अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन न देणे तसेच वेतनात कपात करणे अशा घटना दि. 16 जून 2022 रोजी निदर्शनास आल्या आहे हे खरे आहे काय?
(2)असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने नेमलेल्या विशेष समितीच्या अहवालामध्ये दोषी ठरविण्यात आलेल्या महाविद्यालयांवर अद्याप कोणतीही कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

तांशि ·3